# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(दुपार)

**दिनांक ०३.०८.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :–**

दिनांक ०२.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये २० केसेसमध्ये २२ ईसमावर कारवाई करून एकुण ६४,१९०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०३ केसेसमध्ये १६ इसमांवर कारवाई करुन ३,३८०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,७४२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,१२,६५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक ०२.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ०३.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण ०७ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाची कामगिरी :– गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २२.३० वा. ते ०३.०८.२०२६ चे ००.५० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात हद्यीत पेट्रोलींग करीत असतांना, पोलीस ठाणे सक्करदरा हद्यीत राणी भोसलेनगर झोपडपट्टी, महाकाली शितला माता मंदीरजवळील, स्टेजचे बाजूला एक इसम संशयीतरित्या पिशवी घेऊन दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पळू लागल्याने त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव विक्की रमेश दुबे वय ३१ वर्ष रा. राणी भोसलेनगर झोपडपट्टी, भांडेप्लॉट, सक्करदरा, नागपूर असे सांगितले. त्याचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्यातील तरतुदींचे तंतोतंत पालन करुन, पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यातील पिशवीमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी १ किलो ३०० ग्रॅम कि. ३२,५००/— रु. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपुस केली असता, त्याने नमुद गांजा त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे अस्लम उर्फ भुऱ्या दाऊद खान वय ४५ वर्षे रा. भांडेप्लॉट, याचेकडून विक्री करीता आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीस मुद्देमालासह सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत क्षिरसागर, पोहवा अरविंद गेडेकर, पवन गजभिये, शैलेश दोबोले, रत्नाकर कोठे, नितीन साळुंके, पोअं, धनपत मंजरेटे, शेषराव रेवतकर व मपोहवा अनुप यादव यांनी केली.



**<u>३) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

मा. पोलीस आयुक्त यांचे एस्कॉर्ट पथकातील अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, दिनांक ०२.०८.२०२६ रोजी रात्री पेट्रोलींग दरम्यान पथक प्रमुख सपोनि. भगवान कोळी यांना माहीती मिळाली की, पोलीस ठाणे कळमणा हद्दीत, गुलशन नगर, शनि मंदीरजवळ राहणारा केशव पोहणीकर नावाचा इसम अवैधरित्या दारुविक्री करीत आहे. अशा माहीतीवरून पथकासह पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, तेथे आरोपी केशव दशरथजी पोहणीकर वय ४८ वर्षे हा अवैधरित्या दारुविक्री करतांना समक्ष मिळुन आला. त्यांचे ताब्यातुन देशी दारु संत्राच्या ९० मिलीच्या १०० बॉटल्स मिळाल्या. तसेच त्याचे जवळील ज्युपीटर मोपेड गाडी क्र. एमएच ४९ सीपी ७४६५ ची पाहणी केली असता, डिक्कीमध्ये देशी दारु संत्राच्या ९० मिलीच्या १२० बॉटल्स अशा एकूण २२० नग देशी दारु बॉटल्स कि. ११,०००/—रू. चा मुद्येमाल मिळून आला. आरोपीचे ताब्यातुन देशी दारु व मोपेड असा एकुण ९१,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ६५(ई) मदाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी सपोनि. भगवान कोळी, पोउपनि सौरभ बुनगे, पोहवा. अमित परतेकी, पोअं. अर्शद शेख, आशिष गायधने, मनोज निमकर, दिनेश क्षिरसागर व प्रफुल धरमाडे यांनी केली.



**४) गुन्हेशाखा, युनिट क्र. ६ पोलीसांची कामगिरी :— जुगार खेळणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे २०.३० वा. ते २३.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा, युनिट क्र. ६ पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, त्रिशरण बुध्द विहाराजवळ, हुडको कॉलनी, क्वॉर्टर क्र. १२०, पहिला माळा, फटींगचे राहते घरी पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, नमुद ठिकाणी आरोपी क्र. १) चंद्रशेखर बालकदास साखरे वय ५१ वर्षे, २) अशोक ज्ञानेश्वर मेंढे वय ४४ वर्षे, ३) मंगेश श्रीहरी वानखेडे, वय ४८ वर्षे, ४) जगमिंदर गुरुमितसिंग बग्गा वय २३ वर्षे, ५) अमित शिलनाथ नितनवरे वय ३६ वर्षे, ६) राजेश दीपक कापसे वय ४६ वर्षे, ७) राहुल तुकाराम वालदे वय ४२ वर्षे, ८) प्रविण सुरेश भोवते वय ३६ वर्षे, ९) कमल शिवनाथ नितनवरे वय ३३ वर्षे, १०) सिनु मुंगेश्वर सेतियाद वय २८ वर्षे, सर्व रा. हुडको कॉलनी, जरीपटका, नागपूर ११) सचिन संभाजी तोडसाम वय ४२ वर्षे, रा. प्लॉट क्र. ५३४, कुशीनगर, जरीपटका १२) दुर्गेश नंदलाल शाहु वय ३४ वर्षे रा. प्लॉट क्र. ३६,मिसाळ ले आऊट, जरीपटका, १३) अनुप अनिल धमगाये वय ३६ वर्षे रा. प्लॉट क्र. ३२, अंगुलीमाल नगर, कपीलनगर, नागपूर हे समक्ष ताश पत्यावर पैश्यांची बाजी लावुन हार—जीतचा जुगार खेळतांना मिळुन आले. आरोपींचे ताब्यातुन रोख ३५,०००/—रू., वेगवेगळ्या कंपनीचे एकुण ११ मोबाईल फोन, ताश पत्ते व ईतर साहित्य असा एकुण १,५७,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे जरीपटका येथे कलम ४, ५ महा. जुगार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्देमालासह जरीपटका पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भरत कऱ्हाडे, सपोनि सचिन गायकवाड, पोउपनि राहुल रोटे, पोहवा नारायण पारवेकर, पोअं, रविंद्र राऊत, लक्ष्मीकांत सोनटक्के, राहुल पाटील, अजिंक्य घुले, मनिष मिश्रा यांनी केली.

**५) गुन्हेशाखा, युनिट क्र. १ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे १८.३५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. १ चे पथकातील अधिकारी व अंमलदार तपास पथक हे पोलीस ठाणे एमएआयडीसी हद्दीत पेट्रोलींग करीत असता, यशोदानगर नाल्याजवळ एक इसम संशयीतरित्या दिसुन आल्याने त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नितेश उर्फ बच्चा गुणवंत कालभुत वय ३३ वर्षे रा. वार्ड क्र. ५, इंदीरामाता नगर, एमआयडीसी हमु. सुभाषनगर, प्रतापनगर, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी तलवार मिळून आल्याने किंमती ५००/—रू. ची जप्त करण्यात आली. आरोपीस पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. १४/२०२४, दिनांक २८.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि प्रशांत ठवरे, सपोनि राजाभाऊ जाधव, पोहवा योगेश वासनिक, रितेश तुमडाम, पोअ. कुणाल गेडाम व अजमत शेख यांनी केली.

**६) गुन्हेशाखा, युनिट क्र. ३ पोलीसांची कामगिरी :— मंदीरात चोरी करणारा आरोपी अटकेत.**

दिनांक ०१.०८.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे ठाणे शांतीनगर हद्दीत, लालगंज गुजरी, शांतीनगर येथील फिर्यादीचे घरासमोर असलेल्या हनुमान मंदीरात कोणीतरी अज्ञात चोरट्याने, लोकांची नजर चुकवुन दुर्गादेवी मुर्तीवरील चांदीचा मुकुट व दोन किलो पितळी घंटा असा एकूण २५,०००/— रुपये चा मुद्येमाल चोरून नेला. फिर्यादी यश अनिल किरदक वय २४ वर्ष यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे शांतीनगर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५ भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासात गुन्हेशाखा युनिट क्र. ३ चे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, तसेच मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी श्रावण कृष्णाजी खापरे वय ६२ वर्ष रा. प्लॉट क्र. ४४, राजापेठ, हुडकेश्वर, नागपूर यास ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद मंदीर चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन रोख ४५०/—रू., ०१ पितळी घंटा असा एकुण २,४५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव शांतीनगर पोलीसांच ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि अतुल मोहनकर व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०२.०८.२०२६ चे १९.०० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, आठवडी बाजार, आठवा मैल परिसर येथे पोलीस ठाणे हद्दीतुन हद्दपार असलेला इसम दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळाल्याने, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रोहन कैलास राऊत वय ३० वर्षे रा. मोहाडे ले आऊट, आठवा मैल, वाडी, नागपूर असे सांगीतले. त्यास परवानगीबाबत विचारले असता, त्याने कोणतीही परवानगी नसल्याचे सांगितले. आरोपीस पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केले असतांना, तो कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. विनोद कुंभलकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. सतिश गुलबे यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :— जबरी संभोग करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक १८.०६.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, राहणाऱ्या ३६ वर्षीय फिर्यादी यांची अल्पवयीन मुलगी घरी असतांना, त्यांचा परिचीत आरोपी सुरज गौतम मडके वय १९ वर्षे, रा. मेंढेपठार, ता. काटोल, जि. नागपूर याने फिर्यादी घरी नसतांना, फिर्यादीचे घरी येऊन फिर्यादीची मुलगी अल्पवयीन असल्याचा फायदा घेऊन तिचेसोबत जबरीने शारीरिक संबंध प्रस्थापीत केले. तसेच आरोपीने पिडीतेस कोणाला काही सांगितल्यास, जिवे मारण्याची धमकी दिली. फिर्यादी यांनी अल्पवयीन मुलीस उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, ती गर्भवती असल्याचे निष्पन्न झाल्याने, पिडीतेने नमुद बाब फिर्यादीस सांगितली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी रोजी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि रणजीत रणनवरे ८८०५५७२०६९ यांनी आरोपीविरूध्द कलम ६४,६५(२),३५१(ब) भा.न्या.सं. सहकलम ४,६, पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल करून, **आरोपीस अटक केली आहे.** पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. जिल्हा न्यायाधीश —१९ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | १००२२६ /२००७ | कलम १३५, १३८ भारतीय विद्युत कायदा | अक्रम खान रा. कुंदनलाल गुप्ता नगर, नागपुर | १२.०९.२०२६ |

स्वा/—

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.